विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर या कार्यालयाचे अधिनस्त आस्थापनेवरील गट-क (लिपीक टंकलेखक) व गट-ड (शिपाई) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात

जा.क्र.विसनि(लेप)को/आस्था/प्र.क्र.१९०/अनु.जमाती/अधिसंख्य पदे/४१/सन २०२० दि.०३/०१/२०२०

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि.२१/१२/२०१९ अन्वये सर्व प्रशासकीय विभागांनी खुद्द व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे अधिकारी व कर्मचाऱ्यांना **अधिसंख्य पदावर वर्ग** झाल्यानंतर **रिक्त** होणारी अनुसुचित जमातीच्या प्रवर्गाची पदे **अनुसुचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक** उमेदवारांमधून सेवाप्रवेश नियमानुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून भरण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून भरण्याची कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने वरील परिच्छेदात नमुद शासन निर्देशानुसार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर या कार्यालयाचे कार्यक्षेत्रांतील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील आस्थापनांवरील गट-क (लिपीक टंकलेखक) व गट-ड (शिपाई) संवर्गातील अनुसुचित जमाती प्रवर्गातील पदे भरावयाची असून सदर पदाकरीता **अनुसुचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक** पात्र व इच्छूक उमेदवारांकडून दि.१०/०१/२०२० पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत.

पदाचे नाव	प्रवर्ग	पदसंख्या	समांतर आरक्षण						समांतर आरक्षणा व्यतिरिक्त (सर्वसाधारण)
			महिला	माजी सैनिक	अंशकालीन	प्रकल्पग्रस्त	खेळाडू	भूकंपग्रस्त	
लिपिक-टंकलेखक	अनु. जमाती	२	०	०	०	०	०	०	२
शिपाई	अनु. जमाती	३	१	०	०	०	०	०	२

टीप :-

१) आंतरविभागीय / आंतर जिल्हा, अतिरिक्त संवर्ग कक्ष, इतर विभागातील पदांचा आढावा इत्यादी कारणास्तव जाहिरातीत नमुद पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. तसेच परिक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, याबाबतीत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचा निर्णय अंतिम असेल. उमेदवारांचे कोणतीही हरकत अथवा तक्रार यांचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी अर्ज भरताना नोंद घ्यावी.

२) शासनाने भरतीबाबत / नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक, आदेश इत्यादी भरती प्रक्रियेला लागू राहतील.

लिपीक-टंकलेखक संवर्ग :- ७ वा वेतन आयोगाप्रमाणे वेतन स्तर एस-६ (१९९००-६३२००) अधिक देय भत्ते.

पात्रता:- शैक्षणिक अर्हता - सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेची **पदवी** किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता. टंकलेखन - शासकीय शाळेचा प्रमाणपत्र परिक्षा (मराठी ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि.) उत्तीर्ण आवश्यक. संगणक अर्हता – शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान शा.नि. दिनांक ०४/०२/२०१३ व सा.प्र.वि.अधिसुचना दि.०६/०६/२०१७ मध्ये नमुद केल्यानुसार संगणक / माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. मराठी, हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहिल.

शिपाई संवर्ग :- ७ वा वेतन आयोगाप्रमाणे वेतन स्तर एस-१ (१५०००-४७६००) अधिक नियमानुसार देय भत्ते.

पात्रता:- शैक्षणिक अर्हता - सामान्य प्रशासन विभागाकडील अधिसुचना दिनांक ०६/०६/२०१७ मध्ये नमुद केल्यानुसार ज्यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण केली आहे. मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.

वयोमर्यादा – वरील पदांसाठी वयोमर्यादा (दि.०६/०१/२०२० रोजीची गणली जाईल) सा.प्र.वि. अधिसूचना दि.०६/०६/२०१७ नुसार १९ वर्षपिक्षा कमी व मागासवर्गीय उमेदवारांकरीता ४३ वर्षपिक्षा वय जास्त नसावे.

लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र - महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ अन्वये दि.२८/०३/२००५ नुसार कुटुंब मर्यादित

अर्जासोबत शुल्क (फी) :- वरील पदांसाठी परिक्षा शुल्क फी स्वरूप १५०/- इतकी राहिल. परिक्षा शुल्क रेखांकित डिमांड ड्राफ्ट विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर या नावाने जोडणे आवश्यक आहे. फी कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाही. माजी सैनिक उमेदवारांना परिक्षा शुल्क माफ असल्याने भरण्याची आवश्यकता नाही.

परिक्षेचे स्वरूप :- लिपीक – टंकलेखक पदाकरिता :- लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक ०२ गुण ठेवण्यात येतील. सा.प्र.वि. शा.नि. दि.१३/०६/२०१८ नुसार लिपीक-टंकलेखक पदासाठी **पदवी** ही कमीत कमी अर्हता असल्याने सदर पदासाठी परिक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील परंतु मराठी या विषयाच्या प्रश्न पत्रिकेच्या दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या (इयत्ता १२ वी) च्या दर्जाच्या समान राहील व लेखी परिक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दीक चाचणी या विषयावरील प्रश्नाकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.

शिपाई पदाकरिता :- शिपाई पदाकरीता अर्ज सादर केलेल्या उमेदवारांसाठी अधिसूचना दि.०६/०६/२०१७ नुसार शिपाई या पदासाठी माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण कमीत कमी अर्हता असल्याने सदर पदासाठी परिक्षेचा दर्जा माध्यमिक शालांत परिक्षेच्या (इयत्ता १० वी) च्या दर्जाच्या समान राहील व लेखी परिक्षेला मराठी, सामान्य ज्ञान व बौध्दीक चाचणी या विषयावरील प्रश्नाकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण १५० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. सा.प्र.वि.शा.नि.दि.१३/०६/२०१८ मधील तरतुदीनुसार दोन्ही पदांकरीता मौखिक परिक्षा (मुलाखती) घेण्यात येणार नाहीत.

इतर महत्वाच्या अटी व शर्ती :- उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याच्याकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र / महाराष्ट्रात जन्म झालेबाबतचा जन्म तारखेचा दाखला / शाळा सोडल्याचा दाखला त्यामध्ये जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक राहील फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थींसाठी लागू राहतील. इतर परिक्षार्थी / उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

उमेदवाराने अर्जात नमूद केलेली माहिती ग्राहय धरून त्यांना परीक्षेला बसण्याची संधी देण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराने त्यांच्या अर्जामध्ये त्यांच्या पात्रतेनुसार खरी माहिती भरणे आवश्यक आहे. अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा काही त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहिल व याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

उमेदवाराची लेखी परीक्षा ही अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे कोणतेही कागदपत्रे तपासणी व छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवारांनी अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार व मिळालेल्या गुणांच्या आधारे कागदपत्र पडताळणीसाठी बोलावयाच्या उमेदवाराची यादी प्रसिध्द करुन मुळ कागदपत्रांच्या पूर्ण छाननी नंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. आवश्यक पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे अधिकार प्रादेशिक निवड समितीकडे राखून ठेवण्यात आले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

सदरची भरती प्रक्रिया ही **मा.सर्वोच्च न्यायालय यांचेकडील निकालास अनुसरुन** शासन निर्णय दिनांक २१/१२/२०१९ मध्ये नमूद केले प्रमाणे **जात वैधता प्रमाणपत्र (VALIDITY CERTIFICATE) अर्जासोबत सादर करणे** आवश्यक आहे.

उमेदवारांनी एकुण गुणांच्या किमान ४५ % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. परीक्षेचा निकाल (निवडसुची) सा.प्र.वि.शा.नि. दि.१३/०६/२०१८ मध्ये नमुद निकषांच्या आधारे क्रमवार लावला जाईल.या शिवाय निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. सा.प्र.वि.शा.नि. दि.१३/०६/२०१८ उमेदवाराने उत्तर पत्रिकेवर पेनाचा वापर करणे अपेक्षित आहे तेथे, (उदा.बैठक क्रमांक, परिक्षेसंबंधी इतर तपशिलाच्या लिखाणाकरिता, उत्तराच्या चिन्हांकरिता इ.) केवळ काळ्या शाईच्या बॉलपॉईंट पेनाचा वापर करणे आवश्यक आहे. एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकारे दबाव आणल्यास अथवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविणेत येईल.

अंतिम निवडसूची व प्रतिक्षासूचीसाठी विचाराधीन ठरविण्यात येणाऱ्या उमेदवारांनी तपासणीवेळी पात्रतेबाबत सादर करावयाची कागदपत्रे :-

वर नमूद त्या-त्या पदांकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हतेची गुणपत्रिका / प्रमाणपत्राची साक्षांकित प्रती., शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domacile Certificate) तसेच जात वैधता प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती, जन्मतारखेबाबतचा पुरावा (उदा.शाळा सोडल्याचा दाखला, जन्म नोंदणी प्रमाणपत्र) सक्षम अधिका-याकडील अधिवास प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत., विहित शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा धारण करणा-या इच्छूक शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीचे भरावेत व अशा परवानगीचे प्रत मुळ कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. उमेदवाराच्या नावात कोणताही बदल झाला असल्यास, शासन राजपत्रांची साक्षांकित प्रत अथवा विवाह नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

उमेदवाराने लेखी परीक्षेत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे व त्या उमेदवाराची कागदपत्रांच्या पडताळणी अंती ती वैध ठरल्यास अंतिम निवडसूची तयार केली जाईल.

वरील पदांकरीता अर्जाचा नमूना वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द कार्यालयाच्या पत्त्यावर ए-४ साईजच्या कागदावर तो परिपूर्णरित्या सुवाच्छ अक्षरात भरुन अथवा टंकलेखीत करुन डिमांड ड्राफ्टसह सादर करणे. अर्जाचे पाकिटावर ठळक अक्षरात पदाचा उल्लेख करावा. (उदा.लिपीक-टंकलेखक/शिपाई पदासाठी अर्ज) विहित मुदतीनंतर प्राप्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत अथवा अपात्र ठरविणेत येतील, याची नोंद घ्यावी.

सदर पदाकरीता केवळ अनुसूचित जमाती प्रवर्गातील व्यतिरिक्त अन्य प्रवर्गातील उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील व त्याबाबत स्वतंत्ररित्या अर्जदारास कळविण्यात येणार नाही. अर्जाची पात्रता व अपात्रता उमेदवारांना लेखी स्वरुपात कळविली जाणार नाही. फक्त याच जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहितमुदतीत या कार्यालयास प्राप्त होतील, अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील.

उमेदवाराने लिपिक – टंकलेखक व शिपाई पदासाठी आपले अर्ज, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर, प्लॉट नं.एम-४, श्री शाहू मार्केट यार्ड पोस्ट ऑफिस मागे, कोल्हापूर ४१६००५ या पत्त्यावर दिनांक १०/०१/२०२० पर्यंत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व कार्यालयीन कामकाजाचे वेळेत पोस्टाने / समक्ष प्राप्त होतील असे पाठवावे.

उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी स्वाक्षरीची उपस्थित राहावे लागेल. नियुक्ती होणा-या उमेदवारास नवीन परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू राहील. त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाहनिधी योजना लागू राहणार नाही.उमेदवारांचा अर्जात दिलेला पत्ता व्यवहाराचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक बदल्यामुळे अथवा बंद केल्यामुळे अथवा टपाल विभागाच्या विलंबामुळे परीक्षेची संधी हुकल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार आवश्यक तर अर्ज करणे आवश्यक आहे.लिपीक – टंकलेखक व शिपाई संवर्गाच्या परीक्षेचा दिनांक, वेळ, बैठक क्रमांक व ठिकाण इत्यादीचा तपशिल वर नमुद केलेल्या कार्यालयामध्ये प्रसिध्द करण्यात येईल.

ओळखपत्राकरिता आधार कार्डाची/पॅन कार्डाची/वाहन चालविण्याच्या परवान्याची यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची मुळ प्रत उमेदवारांनी सोबत आणणे आवश्यक आहे. ओळखपत्राशिवाय उमेदवारांस परीक्षाकेंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही.

सरळ सेवा भरती प्रक्रियेचा कार्यक्रम

अ. क्र.	भरती प्रक्रिया कार्यक्रम	संभावित दिनांक
१	अर्ज या कार्यालयाकडे सादर करण्याचा अंतिम दिनांक	दि. १०/०१/२०२० पर्यंत (कार्यालयीन वेळेमध्ये)
२	ओळखपत्र उपलब्ध करून घेण्याचा कालावधी	दि.१२/०१/२०२० ते परिक्षेच्या अगोदरच्या दिनांकापर्यंत
३	लेखी परिक्षेचे आयोजन	दि.१९/०१/२०२०

दिनांक :- ०३/०१/२०२०.
ठिकाण :- कोल्हापूर

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
(लेखापरीक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर